# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक २६.०७.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची एनडीपीएस व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २५.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये २३ केसेसमध्ये २३ ईसमांवर कारवाई करून ५७,११०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. जुगार कायदा अन्वये ०३ केसेसमध्ये ०३ इसमांवर कारवाई करुन २,८३०/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,३६३ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,६५,६००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक २५.०७.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २६.०७.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०८ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) वाठोडा पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २६.०७.२०२६ चे ०४.१० वा. चे सुमारास, वाठोडा पोलीसांचे पथक पोलीस ठाणे हद्दीत गरीब नवाज चौक येथे नाकाबंदी राबवित असतांना, त्यांना संशयीतरित्या पांढऱ्या रंगाची टाटा पंच कार क्र. एम.एच. ४९ बि.डब्ल्यु. ४४२७ दिसल्याने थांबविली असता, त्यातील एक ईसम खाली उतरून पळुन गेला. दुसऱ्या इसमास घेराव करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मोहम्मद उजेर शेख जावेद, वय २० वर्षे, रा. बाबा ताजनगर, खरबी, वाठोडा, नागपूर असे सांगीतले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे खिशात झिपलॉक पन्नीत एकुण २७.३३ ग्रॅम एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, मोबाईल व टाटा पंच कार असा एकुण ६,४६,६५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस त्याचे पळुन गेलेला साथीदार पाहीजे आरोपीचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव आवेश खान, वय ३० वर्षे, रा. बाबा ताजनगर, खरबी, वाठोडा, नागपुर असे असुन, एमडी पावडर त्याचे असल्याचे सांगीतले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे वाठोडा येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (पारडी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रमोद पोरे, पोउपनि. सागर गायकवाड, पोअं. वामन, शशिकांत, किरण व निखील यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपींना अटक.**

फिर्यादी श्रीमती गायत्री निकेश सुर्यवंशी, वय ३५ वर्षे, रा. बिल्डींग नं. ४२, क्वॉर्टर नं. १, आवास योजना, सिम्बायोसिस कॉलेज जवळ, वाठोडा, नागपुर यांचा मुलगा नामे पवन निकेश सुर्यवंशी, वय १८ वर्षे याचे मित्राचा काही दिवसांपुर्वी गाडीचा कट लागल्याने आरोपींसोबतवाद—विवाद झाला होता. दिनांक २५.०७. २०२६ चे १५.३० वा. ते १६.३० वा. चे दरम्यान, फिर्यादीचे मुलास व त्याचे मित्राना आरोपी यांनी फोन करून मानेवाडा स्मशान घाट येथे बोलण्याकरीता फोनकरून बोलाविले वरून फिर्यादीचा मुलगा व अमन काळे तसेच ईतर मित्र गेले असता, तेथे आरोपी १) कुणाल धनराज चौरसिया, वय २४ वर्षे, रा. प्लॉट नं. ११५, जुना ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा, अजनी, नागपुर २) वेदांत संदीप कापटे, वय १९ वर्षे, रा. प्लॉट नं. ४२, महाकाली नगर नं. ३, हुडकेश्वर, नागपुर ३) रौनक रमेश राव, वय २१ वर्षे, रा. प्लॉट नं. ३१, जय गुरूदेव नगर, मानेवाडा, बेसा रोड, नागपुर, ४) यश दिलीप लोदे, वय २५ वर्षे, रा. प्लॉट नं. ११४, वेणु कॉर्नर, न्यु ज्ञानेश्वर नगर, नागपुर, ५) देवांश प्रविण श्रीरामे, वय २१ वर्षे, रा. प्लॉट नं. ६४, सुशिला हाऊसिंग सोसायटी, मनिष नगर, नागपुर, ६) प्रज्वल गिरीष नायडु, वय २० वर्षे, रा. कबीरा कॉन्व्हेंट मागे, बेलतरोडी, नागपुर, ७) अनुराग पराग शास्त्रकार, वय २० वर्षे, रा. प्लॉट नं. २२५, जानकी नगर, उदय नगर, रिंगरोड, नागपुर व त्यांचे ईतर साथीदार यांनी संगणमत करून, फिर्यादीचा मुलगा तसेच, त्याचा मित्र अमन अजय काळे, वय १७ वर्षे, रा. विठ्ठल नगर, यांना जिवे मारण्याच्या उद्देशाने शस्त्राने वार करून, गंभीर जखमी केले. फिर्यादीचे मुलास उपचाराकरीता केशव हॉस्पीटल मानेवाडा चौक येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी तपासुन त्यास मृत घोषीत केले. अमन अजय काळे याचा उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे आरोपीविरूध्द कलम १०३(२),१०९(१),६२(२)(अ),१९१(३),१९० भा.न्या.सं., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन त्वरीत दखल घेऊन आरोपीचा शोध घेतला पोलीस ठाणे अजनी येथील तपास पथकाने ०५ आरोपी यांना व हुडकेश्वर पोलीसांनी ०२ आरोपी असे एकुण ०७ आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे एमआयडीसी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक २५.०७.२०२६ चे २३.२० वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे पथक हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, इंदीरा माता नगर, मोठ्या विहीरी जवळ निळ्या रंगाचा शर्ट व जिन्स पॅन्ट घातलेला ईसम लोकांना शिवीगाळ करीत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम दिसून आला. त्यास घेराव टाकून ताब्यात घेवुन त्याचे हातातील लाकडी दांडा काढुन घेतला. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नांव पवन उर्फ किस्सी तुळशिराम कोरडे, वय २४ वर्षे, रा. इंदीरा माता नगर, एमआयडीसी, नागपूर असे सांगितले. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०९/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने धुमधाम

करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोअं. मनोज सोनवणे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे लकडगंज :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २५.०७.२०२६ चे १९.३० वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना मालधक्का परिसर, शितला माता मंदीर समोरील मोकळ्या जागेत एक इसम संशयीतरित्या दिसल्याने, त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन हातातील काहीतरी खाली टाकुन पळु लागला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मनोज घनश्याम निशाद, वय ३२ वर्षे, रा. वार्ड नं. ५, चिखली, केवटपारा, राजनांदगांव (छत्तीसगढ) असे सांगीतले. त्याने खाली टाकलेली वस्तुची पाहणी केली असता, एक जुनी तलवार किमती २००/—रू. ची मिळुन आल्याने जप्त करण्यात आली.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्र बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे पोअं. देवेंद्र सेलुकर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे लकडगंज येथे मपोउपनि. नैना माहुलकर यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे धंतोली :—** दिनांक २६.०७.२०२६ चे ०५.४० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे धंतोली हद्दीत, आरोस कॅफेचे बाजुला फुटपाथवर एमआरएफ पेन्टस दुकानाजवळ एक अनोळखी पुरूष वय अंदाजे २५ ते ३० वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची अद्याप ओळख पटलेली नाही. मृतकाचे वर्णन— केस काळे, दाढी—मिशी बारीक, अंगात ग्रे रंगाचे ज्यावर पांढरे पट्टे असलेला हाफ टि—शर्ट व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेले, हाताचे मुठीजवळ टॅट्ु असुन त्यामध्ये इंग्रजीत एपीएमए असे गोंदलेले आहे. तसेच, मनगटाचे खाली बासरी व मोरपंखाचे गोंदण आहे. नमुद वर्णनाचे मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे धंतोली येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी दिनेश नाथुराम दिक्षीत, वय ५७ वर्षे, रा. आशिर्वाद पॅलेस, धंतोली, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे धंतोली येथे पोउपनि. ज्ञानेश्वर शिरोळे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०१, नागपुर. | ३०४०१४७ /२००५ | कलम ३२४, ३४ भा.दं.वि. | मोहम्मद वसीम मोहम्मद यासीन, रा. नवाबपुरा, लकडापुल, अयाचित मंदीर रोड, नागपुर. | २८.०७.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **२.** | मा. १७ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०४०१९७ /२००१ | कलम ४२०, ३४ भा.दं.वि. | युसुफ अली मज्जीद अली, वय २० वर्षे, रा. खरडा कंपनीजवळ, कळमना रोड, कामठी, नागपुर | २८.०७.२०२६ |
| **३.** | मा. १७ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०१८०९/ २०१० | कलम ३७९ भा.दं.वि. | संतोष एच. वरखडे, वय २३ वर्षे, रा. नमझर टेकाडी, जि. बालाघाट म.प्र. ह.मु.— संजय नगर, पोलीस चौकी मागे, पांढराबोडी, अंबाझरी, नागपुर. | २७.०७.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**